# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **महाराष्ट्र शासनाच्या शासन आपल्या दारी या योजने अंतर्गत तालुका कल्याण, जिल्हा ठाणे येथे मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन**

मा. मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या महाराष्ट्र शासनाच्या शासन आपल्या दारी या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना उपलब्ध व्हावी यासाठी दिनांक ०३ मार्च २०२४ रोजी विविध योजनाबाबत माहिती उपलब्ध करून देण्याकरिता मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व मा. उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या उपस्थितीत ता. कल्याण, जिल्हा ठाणे येथील प्रिमियर मैदान, इरा ग्लोबल शाळेजवळ, कल्याण शिळफाटा मार्ग, कोळे, कल्याण येथे "शासन आपल्या दारी" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रत्येक जिल्ह्यातील ७५ हजार लाभार्थ्यांना एका छताखाली लाभ, शासकीय निर्धारित शुल्कात २०० हून अधिक योजनांचा लाभ, कमीतकमी कागदपत्रे आणि जलद मंजुरी, पहिल्यांदाच सर्व शासन 'हर घर दस्तक' च्या माध्यमातून प्रत्येकाला योजनांची माहिती देण्यात येणार ही या अभियानाची विशेष वैशिष्ट्ये आहेत. सदर कार्यक्रमासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार विविध योजनेचे लाभार्थी व शहरातील गरजू नागरिकांसाठी कार्यक्रम स्थळी पोहचण्याकरिता बस व्यवस्था करून देण्यात आली आहे. तरी या कार्यक्रमासाठी नागरिकांनी उपस्थित राहून विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.